**परिपत्रक क्र. ०१/२०१४**

क्र. उसं/मातं/ विद्युत शुल्क/माफी/प्रमाणपत्र/२०१४/ उसं-२५६०
उद्योग संचालनालय, नविन प्रशासकीय भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: 24 FEB 2014

# परिपत्रक

विषयः- माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा घटकांना द्यावयाच्या विद्युत शुल्क सुट सवलत प्रमाणपत्र देणेसाठी प्राधिकारी विहित करणे.

संदर्भ- १) उद्योग संचालनालयाचे परिपत्रक क्र. ६ /९९ दि. ०७.०५.१९९९

२) उद्योग संचालनालयाचे परिपत्रक क्र. ०२/२००४ दि. २०.०१.२००४

३) महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत धोरण २००९ शासन निर्णय क्र. आयटीपी-२००९/(प्र.क्र.१०८)/ उद्योग-२, दि. २९.८.२००९

४) महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण २०१३ शासन निर्णय क्र. उ. ऊ. व का. वि. पॉलिसी २०१०/प्र.क्र. ७६८/उद्योग-२, दि. २२.०२.२०१३.

महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत धोरण २००९ मधील परिच्छेद ३.१.१(३) अंतर्गत पात्र माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत घटकांना सामुहिक प्रोत्साहन योजनेतील तरतुदीनुसार विद्युत शुल्क अदा करण्यापासून सुट देण्याची तरतुद आहे. महाराष्ट्राचे औद्योगिक धोरण, २०१३ मधील परिच्छेद ४ अंतर्गत महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत धोरण, २००९ मधील परिच्छेद ३ (३) मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार पात्र माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत घटकांना सामुहिक प्रोत्साहन योजनेशी सांगड न घालता, विद्युत शुल्क अदा करण्यापासून सुटीचा कालावधी, अ आणि ब वर्गीकृत तालुका / क्षेत्रातील घटकांना १० वर्ष आणि क, ड, ड+ वर्गीकृत तालुक्यातील आणि विना उद्योग जिल्ह्यांतील घटकांकरिता १५ वर्ष असा राहील.

उपरोक्त संदर्भ क्र. २ नुसार माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत घटकांना इरादापत्र/नोंदणी देण्यासाठी प्राधिकारी व कार्यक्षेत्र विहित करण्यात आले आहेत. त्याच धर्तीवर माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत घटकांना उपरोक्त विद्युत शुल्क सुटीच्या कालावधी साठी प्रमाणपत्र देण्याकरीता सक्षम प्राधिकारी म्हणून खालील अधिकाऱ्यांना त्यांच्यासमोर नमुद केलेल्या कार्यक्षेत्राकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

| अनु क्र. | नोंदणी प्राधिकारी | उद्योगाचा प्रकार व कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| १ | उद्योग सह संचालक/विशेष कार्य अधिकारी (माहिती तंत्रज्ञान), उद्योग संचालनालय, मुंबई | राज्यातील विशेष आर्थिक क्षेत्रातील सर्व माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा उपक्रम (घटक) * |
| २ | उद्योग सह संचालक, (मुंप्रावि), (मुंबई शहर व उपनगर जिल्हयातील क्षेत्र करिता) | सुक्ष्म, लघु, मध्यम व मोठे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा उपक्रम (घटक) (विशेष आर्थिक क्षेत्रातील सर्व घटक वगळून) |

| अनु क्र. | नोंदणी प्राधिकारी | उद्योगाचा प्रकार व कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| ३ | बृहन्मुंबई वगळता, उर्वरित विभागीय सह संचालक व विभागीय अधिक्षकीय उद्योग अधिकारी | मोठे माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा उपक्रम (घटक) (विशेष आर्थिक क्षेत्रातील सर्व घटक वगळून) |
| ४ | बृहन्मुंबई वगळता, उर्वरित जिल्हयातील संबधीत महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र. | सुक्ष्म, लघु व मध्यम माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा उपक्रम (घटक) (विशेष आर्थिक क्षेत्रातील सर्व घटक वगळून) |

* संदर्भ २ नुसार उद्योग सह संचालक/विशेष कार्य अधिकारी (माहिती तंत्रज्ञान), उद्योग संचालनालय हे वर नमुद प्रधिका-यां व्यतिरिक्त राज्यातील मोठ्या/मध्यम/लघु माहिती तंत्रज्ञान घटकांना विद्युत शुल्क सुटीच्या कालावधी साठी प्रमाणपत्र देण्याकरीता सक्षम प्राधिकारी आहेत.

माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा घटकांना पात्रता प्रमाणपत्र खाली नमुद केलेल्या शर्तीवर निर्गमित करण्यात येईल.

शर्ती:-

१. माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा घटक म्हणून उद्योग संचालनालयाचे प्राधिकृत अधिकाऱ्या कडून नोंदणी प्रमाणपत्र निर्गमित असणे बंधनकारक आहे.
२. माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा उद्योग म्हणून विद्युत शुल्क माफीची सवलत घेतलेला घटक, प्रत्यक्षात माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा उद्योग ऐवजी इतर उद्योग/व्यवसाय करतांना आढळून आल्यास अशी प्रकरणे सक्षम विद्युत वितरण यंत्रणेचे अधिकारी हाताळतील व अशा घटकाकडून घेतलेली विद्युत शुल्क माफीची रक्कम व विद्युत शुल्क अधिनियमानुसार लागू दंड एक रकमी वसूलीस पात्र राहील.
३. ज्या घटकांना या आदेशानुसार सवलती देय राहतील अशा घटकांना अन्य कोणत्याही आदेशाद्वारे अथवा नियमाद्वारे जाहीर केलेल्या कोणत्याही योजने अंतर्गत विद्युत शुल्कातून माफी/ सवलत अनुज्ञेय असणार नाही.
४. माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा घटकांना, दिनांक ०१ एप्रिल २०१३ अथवा उत्पादनात गेल्याच्या दिनांकापासुन यापैकी जो दिनांक नंतरचा असेल तेव्हापासुन विद्युत शुल्क अदा करण्यातून सुटीचा कालावधी, अ आणि ब वर्गीकृत तालुका / क्षेत्रातील घटकांना १० वर्ष आणि क, ड, ड+ वर्गीकृत तालुक्यातील आणि विना उद्योग जिल्ह्यांतील घटकांकरिता १५ वर्ष असा आहे.
५. माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभुत सेवा घटक एकदाच विद्युत शुल्क सवलतीसाठी पात्र राहिल.

विकास आयुक्त (उद्योग)
यांच्या मान्यतेने

एस.व्ही.पाटील
२८/०२/२०१४

(एस. व्ही. पाटील)
विशेष कार्य अधिकारी
विकास आयुक्त (उद्योग) यांचे करिता

प्रत माहितीकरिता सादर:-

१) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव (मदतकार्य व पुर्नवसन) महसूल पुर्नवसन विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) सचिव, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
६) सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मुंबई.
९) व्यवस्थापक संचालक, सिडको, मुंबई.
१०) विभागीय आयुक्त, पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती/मुंबई.
११) मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पूर्व), मुंबई.
१४) निमंत्रक, उद्योग मित्र, मुंबई.
१५) संचालक, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क्स ऑफ इंडिया, पुणे.
१६) विकास आयुक्त, सीप्झ, मुंबई/पुणे
१७) उद्योग विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव/कक्ष अधिकारी.
१८) मुख्य अभियंता (वाणिज्य), महावितरण, प्लॉट क्र. जी.९, प्रकाशगड, बांद्रा (पुर्व), मंबई.
१९) विकास आयुक्त (उद्योग) यांचे स्वीय सहाय्य, उद्योग संचालनालय, मुंबई.
२०) उद्योग सह संचालक (माहिती तंत्रज्ञान), यांचे स्वीय सहाय्य, उद्योग संचालनालय, मुंबई.
२१) निवड नस्ती

प्रत माहितीकरीता व उचित कार्यवाहीसाठी

१. उद्योग सह संचालक नाशिक/नागपूर/अमरावती/औरंगाबाद/पुणे/मुंप्रावि/ठाणे
२. तांत्रिक सल्लागार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पूर्व), मुंबई
३. अधिक्षकीय उद्योग अधिकारी उपविभागीय कार्यालय नांदेड
४. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (सर्व)